प्रेसनोट दि.२०/०७/२०१७

## केशवनगर मुंढवा येथील फ्लॅटमध्ये चालणा-या हायप्रोफाइल वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाकडुन छापा कारवाई करुन तीन पिडीत मुलींची सुटका

दि.१९/०७/२०१७ रोजी गुन्हे शाखेकडील गोपनीय माहितीनुसार फ्लॅट नं ५०६, बी-२, इव्हज गार्डन सोसायटी मांजरी रोड केशवनगर मुंढवा पुणे येथे इसम नामे गणेश शिंदे हा त्याचे सोबतची बाई नामे अनिता शिंदे व अन्य साथीदार यांच्या सहाय्याने वेगवेगळ्या ठिकाणच्या मुली ठेवुन त्यांचेकडून वेश्याव्यवसाय करवून घेतो अशी माहिती मिळाल्यावरुन गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांचे नेतृत्वाखालील पथकाकडुन सदर ठिकाणी पडताळणीव्दारे छापा कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई दरम्यान नमुद फ्लॅट मध्ये वेश्याव्यवसायासाठी ठेवलेल्या वेगवेगळया ठिकाणच्या तीन पिडीत मुलींची सुटका करुन सदर फ्लॅटमध्ये हजर असलेला इसम नामे दुर्गेश्वर ऊर्फ सुरज धनबहाद्दुर छत्री, वय २४ वर्षे, सध्या रा.सदर. मु.रावता, पो.सिलंकुटी, थाना माजबाट जि.उदलगुडी, आसाम यास ताब्यात घेण्यात आले. इसम नामे १) गणेश शिंदे २) अनिता शिंदे व ३) अरविंद सुर्यकांत येकुरगे रा.कांचन श्रृष्टी फार्मजवळ पौड जि.पुणे हे ताब्यात घेतलेला इसम ४) दुर्गेश्वर ऊर्फ सुरज धनबहाद्दुर छत्री, वय २४ वर्षे, सध्या रा.सदर. मु.रावता, पो.सिलंकुटी, थाना माजबाट जि.उदलगुडी, आसाम याच्या साहयाने सदर फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसाय चालवित असल्याचे उघडकीस आले. छापा कारवाई दरम्यान अन्य साहित्यासह आरोपित मुलींची ने-आण करण्यासाठी वापरत असलेल्या यामाहा कंपनीची एफ झेड व होंडा कंपनीची ॲक्टीव्हा अशा दोन मोटर सायकल्सही जप्त करण्यात आल्या आहेत.

गि-हाईकांना सुंदर मुलींकडुन फुल बॉडी मसाजच्या नावाखाली मेसेजेस पाठवुन सदर वेश्याव्यवसाय चालविला जात होता. तसेच दैनिक वर्तमानपत्रात दिलेल्या मसाज सेंटरच्या जाहीरातीच्या अनुषंगाने कामाकरीता संपर्क केलेल्या पिडीत मुलींना आरोपित इसम हे पैशांची भुरळ घालुन वेश्याव्यवसायात ओढत होते.

या छापा कारवाईच्या अनुषंगाने इसम नामे १) गणेश शिंदे २) अनिता शिंदे ३) अरविंद सुर्यकांत येकुरगे रा.कांचन श्रृष्टी फार्मजवळ पौड जि.पुणे व ४) दुर्गेश्वर ऊर्फ सुरज धनबहाद्दुर छत्री, वय २४ वर्षे, सध्या रा.सदर. मु.रावता, पो.सिलंकुटी, थाना माजबाट जि.उदलगुडी, आसाम यांचेविरोधात मुंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २१५/२०१७ इटपा ॲक्ट १९५६ चे क. ३, ४, ५, ६, सह भादंवि कलम ३७०अ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर, मा.श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.श्री.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, ,पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील यांचे देखरेखीमध्ये सामा.सुरक्षा विभाग गुन्हे शाखेकडील सपोनि चंद्रकांत जाधव, सपोनि शीतल भालेकर व स्टाफ सचिन कदम, नामदेव शेलार, संजय गिरमे, प्रमोद म्हेत्रे, नितीन तरटे, राजेश उंबरे, रमेश लोहकरे, प्रदिप शेलार, सचिन शिंदे, राजेंद्र कचरे, विजय काळे महिला कर्मचारी गितांजली जाधव, रुपाली चांदगुडे, सरस्वती कागणे तसेच मुंढवा पोलीस स्टेशन कडील स्टाफ यांनी केलेली आहे.